सिंधुदुर्ग, सोमवार, ८ ऑगस्ट २०२२ शहर-जिल्हा पुढारी

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयाचा वर्धापन दिन उत्साहात

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

आयुष्यात मोठी उंची गाठण्यासाठी कठीण परिश्रम, कष्ट करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी दाखवायला हवी. प्रत्येक क्षणी प्रत्येक कामाला विशेष महत्त्व देत कार्य करायला हवे. कोणतेही काम नि:संकोचपणे केले पाहिजे. आपण कायम कष्ट, अभ्यास, काहीतरी नवीन शिकण्याची तयारी दर्शविली पाहिजे. आपल्याला मिळणारे प्रत्येक काम ही एक प्रकारची संधी आहे असे समजून काम करत राहिल्यास तुमच्या आयुष्याचे नक्की सोने होईल, असे मत महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. पेडणेकर यांनी स्पष्ट केले.

नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचा २१ वा वर्धापन दिन शनिवारी झाला. यावेळी डॉ. पेडणेकर बोलत होते. संस्थेचे सदस्य सूर्यकांत परमेकर, पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य विवेकानंद नाईक, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पत्रकार तेजस देसाई, भूषण सावंत यांसह सर्व प्राध्यापक, महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्येक विद्यार्थ्याने इतिहास घडविला पाहिजे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी आपल्या आचार-विचारांच्या कक्षा विस्ताराव्यात, असे आवाहन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विवेकानंद नाईक यांनी केले. येथे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने आयुष्यात कितीही मोठे झालात तरी महाविद्यालयाला विसरू नका, असे भावोद्गार सूर्यकांत परमेकर यांनी काढले.



हळबे महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलताना डॉ. पेडणेकर व अन्य.